# नेमाडे यांना साहित्य अकादमीची फेलोशिप प्रदान

## 'विंदा'नंतर २६ वर्षांनंतर मराठी साहित्यिकाला बहुमान

मुंबई, ता. २६ : 'कोसला'कार व ज्ञानपीठ पुरस्कार विजेते डॉ. भालचंद्र नेमाडे यांना साहित्य अकादमीने फेलोशिप आज (ता. २६) प्रदान केली. दादर येथील मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या सुरेंद्र गावसकर सभागृहात साहित्य अकादमीने खास कार्यक्रमाचे आयोजन केले होते. त्यात अकादमीचे अध्यक्ष व कन्नड साहित्यिक डॉ. चंद्रशेखर कंभार आणि सचिव के. श्रीनिवासराव यांच्या हस्ते नेमाडे यांना फेलोशिप प्रदान करण्यात आली.



डॉ. भालचंद्र नेमाडे

नेमाडे यांच्या साहित्यावरील योगदानासंदर्भात ज्येष्ठ साहित्यिक रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली 'संवाद' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी के. श्रीनिवासराव यांनी नेमाडे यांच्या साहित्याचे योगदान स्पष्ट करत ही फेलोशिप देण्यामागील भूमिका स्पष्ट केली. मराठी भाषेतील लेखकाला साहित्य अकादमीचा तब्बल २६ वर्षांनंतर सन्मान मिळत आहे. यापूर्वी विंदा करंदीकर यांना या फेलोशिपने सन्मानित करण्यात आले होते, अशी माहिती त्यांनी दिली. अकादमीचे अध्यक्ष डॉ. चंद्रशेखर कंभार यांनी नेमाडे यांच्या साहित्यातील योगदानाचा गौरव करत त्यांना शुभेच्छा दिल्या.

### लेखकांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत

नेमाडे यांना मिळालेला साहित्य अकादमीच्या फेलोशिपचा बहुमान हा महाराष्ट्रीय लोकांचा बहुमान आहे. नेमाडे यांनी मराठी साहित्याचे क्षितिज व्यापक करण्याचे काम केले. त्यांच्यामुळे लेखकांना आत्मविश्वास मिळाला. त्यामुळे सांस्कृतिक बळ निर्माण करणारा लेखक आपल्यात आहे, हे आपले भाग्य असल्याचे ज्येष्ठ साहित्यिक रंगनाथ पठारे म्हणाले.